# निवारा को. ऑप. हौऊ. सोसायटी लि.

नोंदणी क्र. एन बी ओ एम/ सिडको/ एच एस जी (ओ एच)/ १६५/ जे टी आर/ ९५-९६
दि. ११ ऑक्टो. १९९५

सी विंग, इमारत क्र. १ ते ३३, सेक्टर- ३, सानपाडा, नवी मुंबई- ४०० ७०५.


संदर्भ क्र.: CL/SE/64/26-27 दिनांक : : 26.08.2026

## विशेष सर्वसाधारण सभेची सूचना

निवारा को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. सोसायटीतील सर्व सभासदांना कळविण्यात येते की, सोसायटी ईमारतीच्या पुनर्विकासासंबंधी सोसायटीची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ०६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता श्री सौराष्ट्रा पटेल समाज हॉल, सेक्टर-२, सानपाडा, नवी मुंबई येथे खालील विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी सदर सभेस वेळेवर उपस्थित राहावे, हि विनंती.

### विषय पत्रिका

१. सोसायटीच्या पुनर्विकासासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधून विकासकांची प्राथमिक निवड (शॉर्टलिस्टिंग) निश्चित करणे.
२. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करून निर्णय घेणे.

श्री. नागण्णा गट्टे
सचिव

NIWARA CHS LTD. Regn. No. NBOM/CIDCO/HSG (OH) 165/JTR 95-96 Sector-3, Sanpada Navi Mumbai-400 705

सुचना:-

१. सदर विशेष सर्वसाधारण सभेस संस्थेच्या एकूण सभासद संख्येच्या दोन तृतीयांश सभासदांचा कोरम असणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.
२. सदर सभेस संस्थेचे बोनाफाईड सभासद, सहयोगी (Associate) सभासद व प्रोव्हिजनल (Provisional) सभासद उपस्थित राहू शकतात, तथापि मतदानाचा अधिकार लागू कायदे व संस्थेच्या उपविधींनुसार राहील.
३. शॉर्टलिस्ट करण्यात आलेल्या डेव्हलपर्सचा तुलनात्मक तक्ता (Comparative Chart) सभासदांच्या अवलोकनासाठी २७ ऑगस्ट २०२६ पासून कार्यालयीन वेळेत संस्थेच्या कार्यालयात येऊन पाहता येईल.
४. ज्या सभासदांना विशेष सर्वसाधारण सभेमध्ये काही प्रश्न विचारायचे असतील, ठराव, सुचना मांडावयाच्या असतील तर त्या सभासदांनी ७ दिवस अगोदर लेखी स्वरूपात संस्थेच्या कार्यालयात दयाव्यात.
५. सदर विशेष सर्वसाधारण सभेच्या संपूर्ण कामकाजाचे पारदर्शकता व अभिलेखाच्या दृष्टीने दृकश्राव्य चित्रीकरण (व्हिडिओ शूटिंग) करण्यात येणार आहे.
६. संस्थेच्या सभासदांसाठी सभेच्या ठिकाणी/सभागृहामध्ये भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**विशेष सूचना : प्रत्येक सभासदाने आपले मत शांत प्रकारे मांडावे. दुसऱ्या सभासदांचे म्हणणे शांतपणे ऐकून घ्यावे जेणे करून सभेचे कामकाज चांगल्या प्रकारे पार पडेल.**

**प्रत : १. सर्व सभासद २. सूचना फलक**